ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख ११ मार्च, १९५६ अंक ११

## विविध माहिती

**गिर्यारोहणविषयक संस्था**— दार्जिलिंग येथें स्थापन करण्यांत यावयाच्या गिर्यारोहणविषयक संस्थेच्या स्थापनेसाठी प्रारंभीं ८ लाख रुपये भांडवल घालावें लागेल, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. त्याशिवाय दरसाल सुमारें दोन लाख रुपये खर्चावे लागतील. भांडवली खर्चापैकीं ७० टक्के खर्च भारतीय सरकार सोसणार आहे, असेंहि सांगण्यांत आलें.

**आयुर्वेदाचा सल्लागार**—भारतामधील देशी औषधांचा अधिक उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें सल्ला देण्यासाठी भारतीय सरकारनें एक आयुर्वेदिक सल्लागार नेमण्याचें ठरविलें आहे असें समजतें. जामनगर येथें आयुर्वेदविषयक संशोधन केंद्र आहे. तेथील संशोधनाला अधिक गति देण्याचें कामहि सल्लागारानें करावयाचें आहे. असा सल्लागार नेमण्याची ही पहिलीच वेळ आहे.

**भडोच म्युनिसिपालिटीला कर्ज**— भडोच शहराला पाण्याचा पुरवठा करण्याच्या योजनेसाठी मुंबई सरकारनें ३७ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्जाची रक्कम सहा महिन्यांच्या अंतरानें देण्यांत येईल. पहिला हप्ता १५ लाखांचा, दुसरा १२ लाखांचा, व तिसरा १० लाख रुपयांचा देण्यांत येईल. कर्जाची फेड ३० वार्षिक हप्त्यांनीं करावयाची असून व्याजाचा दर ४·५ टक्के आहे.

**रशिआंत हिऱ्याच्या खाणी**—सोव्हिएट रशिआंतील याकुरिआ ह्या उपराज्यांत विपुल हिरे देणाऱ्या खाणी सांपडल्या आहेत असें समजतें. ह्या राज्यांतील बराच भाग पाणथळ व डांसांनीं गजबजलेला आहे. तथापि, ह्या नव्या शोधामुळें राज्याची भरभराट होईल आणि जगांतील बाजारांत रशिआंतील हिरे येतील असा संभव आहे.

**राजस्थानमधील दारूबंदी**—भारतीय सरकारनें नेमलेल्या दारूबंदी चवकशी कमिशनच्या शिफारसींना राजस्थान-सरकारनें मान्यता दिलेली आहे. तथापि, दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालावधींत राज्यांत संपूर्ण दारूबंदी अंमलांत आणणें शक्य होणार नाहीं, असें राजस्थान सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं मध्यवर्ती सरकारला कळविलें आहे.

**भारतीय सांस्कृतिकमंडळाचा दौरा**—भारतीय सरकारनें भारताच्या सांस्कृतिक प्रतिनिधींचें एक मंडळ परदेशांत दौऱ्यावर पाठविण्याचें ठरविलें आहे. मंडळाचें नेतृत्व श्री. पृथ्वीराज कपूर ह्या प्रसिद्ध नटाकडे देण्यांत आलें आहे. ब्रह्मदेश, सिंगापूर, लाओस, कँबोडिआ आणि इंडोनेशिआ इतक्या देशांना मंडळ भेटी देणार आहे.

**सुताची सहकारी गिरणी**— सौराष्ट्रांत लिमडी ह्या ठिकाणीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी सुताची गिरणी उभारण्यांत येत आहे. राज्यांतील हातमाग विणकरांना वाजवी भावानें सुताचा पुरवठा करण्यासाठी ती काढण्यांत आली आहे. गिरणीच्या पायाभरणीचा समारंभ नुकताच झाला. गिरणीसाठी ५० लाख रुपयांचें भांडवल लागणार असून तींत १२ चात्या बसविण्यांत येणार आहेत. सुताचें रोजचें उत्पादन सुमारें ७,००० गासड्या होईल.

**दुधाच्या वाहतुकीच्या टाक्या**— कोलंबो मदतयोजनेप्रमाणें न्यूझीलंड भारताला दुधाच्या २० टाक्या पुरविणार आहे. ह्या टाक्यांच्या आंतील बाजूला डाग न पडणारा पोलादाचा पत्रा बसविण्यांत आला आहे. टाक्यांपैकीं ९ टाक्या मुंबई बंदरांत आल्या आहेत. प्रत्येक टाकींत ३,००० गॅलन दूध मावूं शकतें. रेल्वेवर अगर रस्त्यावर ओढून नेण्यासाठी त्यांना चाकेंहि बसवितां येतात.

**सामुदायिक शेतीचा विस्तार**— सोव्हिएट रशिआंत खाजगी मालकीच्या शेतीचा संकोच करून सामुदायिक शेतीचा आणखी विस्तार करण्यासाठी उपाय योजण्यांत येत आहेत. रशिआंत सध्यां ९०,००० सामुदायिक शेतें आहेत सामुदायिक शेतींतील व्यवस्थापकांना व कामगारांना उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें अधिक स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे. उत्पादनवाढीसाठी प्रलोभनेंहि वाढविण्यांत आलीं आहेत.

**भारताच्या योजनेची प्रशंसा**— ब्रिटनच्या मजूर-मंत्रिमंडळांतील एक सभासद मि. जॉन स्ट्रॅची ह्यांनीं भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची प्रशंसा केली आहे. लोकसत्ताधिष्ठित समाजवाद आणण्याचा जगांतील हा पहिलाच मोठा प्रयत्न आहे, असें वर्णन त्यांनीं केलें. भारताचे आकडेशास्त्रज्ञ प्रा. महालनवीस ह्यांच्या आमंत्रणावरून भारतीय कार्यक्रमाचा अभ्यास करण्यासाठी ते आले आहेत.

**जपानी पद्धतीची शेती**— मुंबई सरकारनें भाताच्या लागवडीप्रमाणेंच गहूं आणि कापूस ह्यांच्या लागवडीसाठी जपानी पद्धतीचा अवलंब करण्याचें ठरविलें आहे. ही पद्धत खानदेशांत कांहीं ठिकाणीं प्रयोग म्हणून वापरण्यांत आली असतां, तिचा चांगला फायदा झाल्याचें आढळून आलें आहे. महाराष्ट्रांतील गव्हाच्या उत्पादनाचें दर एकरीं प्रमाण २० मण आहे, तें ३५ मणांपर्यंत वाढवितां येईल, असें सरकारी शेती-अधिकाऱ्यांचें म्हणणें आहे.

## नव्या अर्थसंकल्पांतील करयोजनेचें स्पष्टीकरण

जाडींभरडीं धोतरें व साड्या वगळून बाकी सर्व प्रकारच्या कापसाच्या कापडावर दर चौरस वारास दोन पैसे या दरानें अबकारी कर बसविण्यांत आला आहे. हातमागी कापडावर अबकारी कर नाहीं. चालू व संकल्पित दराचा तक्ता पुढें दिला आहे.

| कापडाचा प्रकार | कराचा चालू दर ( दर चौ. वारास ३ पै या दरानें असलेला हातमाग कर सोडून ) ( दर चौरस वारास ) | संकल्पित दर ( दर चौ. वारास ३ पै या दरानें असलेला हातमाग कर सोडून ) ( दर चौरस वारास ) |
|---|---|---|
| | रु. आ. पै | रु. आ. पै |
| ( १ ) अतितलम | ० – २ – ० | ० – २ – ६ |
| ( २ ) तलम | ० – १ – ३ | ० – १ – ९ |
| ( ३ ) मध्यम | ० – ० – ६ | ० – १ – ० |
| ( ४ ) जाडेंभरडें | ० – ० – ६ | ( अ ) धोतरें नि साड्यांवर दर चौ. वारास ६ पै. ( ब ) इतर सर्व कापडावर दर चौ. वारास १ आणा. |

कताईची यंत्रसामग्री नसलेल्या कापडाच्या यंत्रमागकारखान्यांच्या बाबतींत हल्लीं द्याव्या लागणाऱ्या अबकारी करांत पुढील-प्रमाणें फेरफार करण्यांत आले आहेत.

| दरमहा दर पाळींत दर मागामागें | चालू रु. आ. पै | संकल्पित रु. आ. पै |
|---|---|---|
| (१) २४ हून अधिक माग असणाऱ्या उत्पादकांच्या बाबतींत | ३२–८–० | ३०–०–० |
| (२) ९ हून अधिक पण २४ हून कमी माग असणाऱ्या उत्पादकांच्या बाबतींत | २०–०–० | २४–०–० |
| (३) ४ हून अधिक पण ९ हून कमी माग असणाऱ्या उत्पादकांच्या बाबतींत | १८–०–० | बदल नाहीं |
| (४) ४ हून कमी माग असणाऱ्या उत्पादकांच्या बाबतींत | ०–०–० | बदल नाहीं |

### तेलांवर कर

सुगंधी अर्क न निघणाऱ्या वनस्पति तेलांच्या बाबतींत दर रत्तलामागें २ पैसे अबकारी कर बसविण्यांत आला आहे. हा कर देखील विजेचा वापर करून तयार होणाऱ्या तेलांवर असून अशा कोणाहि कारखानदारानें एका आर्थिक वर्षांत घरगुती वापरासाठी म्हणून कारखान्यांतून बाहेर पाठविलेल्या पहिल्या १२५ टन तेलावर कर लागूं होणार नाहीं. याचा अर्थ असा कीं, विजेचा वापर न करणाऱ्या तेलघाण्यांत व १२५ टनांहून कमी उत्पादन असणाऱ्या पण विजेवर चालणाऱ्या कारखान्यांतील तेलावर कर बसणार नाहीं. करांची ही आकारणी पुढील तेलांच्या बाबतींत होईल. एरंडेल, गोडें तेल, अळशीचें तेल, करडईचें तेल, मोहरीचें तेल, खोबरेल, तिळेल वगैरे.

### चहावरील निर्यात कर

परकीय चलन मिळवून देणाऱ्या वस्तूंत चहा ही एक महत्त्वाची वस्तु असल्यामुळें विशिष्ट दर्जाच्या चहावरील निर्यात कर कमी करण्यांत आला आहे. दर पौंडास ३–४–० रुपयांहून अधिक पण ४ रुपयांहून कमी किंमतीच्या चहावरील निर्यात कर दर पौंडास ८ आण्यांऐवजीं ६ आणे घेण्यांत येईल. यामुळें आतां दर पौंडास २–८–० रुपयांपासून ४ रु. पौंडापर्यंत किंमत असणाऱ्या चहावर सरास निर्यात कर पौंडास ६ आणे राहील. गेले कांहीं महिने चहाची निर्यात कमी प्रमाणांत होत असल्यामुळें ही सूट देण्यांत आली आहे.

### प्राप्ति–कर

प्राप्ति–कर व सुपर टॅक्सच्या बाबतींत करण्यांत आलेले कांहीं बदल पुढीलप्रमाणें :—

रजिस्टर्ड फर्मच्या बाबतींत प्राप्तिकराची आकारणी :—सध्यां प्राप्ति–कर कायद्याखालीं नोंद करण्यांत आलेल्या भागीदारी असणाऱ्या कंपनीस कांहीं कर द्यावा लागत नाहीं. परंतु त्यामधील भागीदारांना मिळणाऱ्या लाभावर, त्यांच्या वैयक्तिक कर आकारणीच्या दरानें कर भरावा लागतो. यापुढें हा कर कंपनीनेंच पुढील दरानुसार भरावयाचा आहे.

| | | |
|---|---|---|
| ( १ ) एकूण उत्पन्नांतील पहिल्या | ७५,००० रुपयांवर | दर रुपयास ९ पै |
| ( २ ) पुढील ७५,००० रुपयांवर | | दर रुपयास १ आणा |
| ( ३ ) त्यापुढील सर्व उत्पन्नावर | | दर रुपयास १॥ आणा |

त्या कंपन्यांतील भागीदारांनाहि त्यांच्या उत्पन्नावर कर द्यावा लागेल. परंतु त्यामध्यें कंपनीनें दिलेल्या करांतील त्यांच्या वांट्याइतक्या रकमेवर तें भरीत असलेल्या प्राप्तिकराच्या दरानें सूट मिळेल. नोंद केलेल्या कंपन्यांवरील हा कर वार्षिक ४०,००० रुपयांहून अधिक उत्पन्न होणाऱ्या कंपन्यांनाच द्यावा लागेल. म्हणजे कमी उत्पन्नाच्या कंपन्यांवर हा कर बसणार नाहीं. याखेरीजहि ४०,००० रुपयांहून थोडें अधिक उत्पन्न होणाऱ्या कंपन्यांना थोडी सूट देण्यासाठीं म्हणून ४०,००० ते ४४,१४० रु. उत्पन्न होणाऱ्या कंपन्यांनीं पूर्ण दरानें कर न भरतां ४०,००० रुपयांहून जेवढें अधिक उत्पन्न असेल त्याच्या निमपट एवढा कर भरावा असें ठरविण्यांत आलें आहे.

### चलनवृद्धीसाठीं कायद्यांत दुरुस्ती

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठीं लागणारें चलन निर्माण करण्याकरितां रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायद्यांत दुरुस्ती करण्याचा सरकारचा विचार आहे. चलनी नोटांना सध्यां ४०% रोख्यांचा आधार लागतो, तो ३०% करण्यांत येईल व आधारभूत सोन्याचें नव्या दरानें मूल्यमापन करण्यांत येईल. अशा रीतीनें, रिझर्व्ह बँकेस आणखी १३५ कोटी + ७८ कोटी रुपयांच्या नोटा काढतां येतील.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

# अर्थ

बुधवार, ता. २१ मार्च, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शेतीच्या ह्या वरकड मालाचें करावें तरी काय ?

### अमेरिकेपुढील अवघड प्रश्न !

अमेरिकेच्या सरकारपुढें शेतीच्या वरकड मालाचें काय करावें असा प्रश्न उभा राहिला आहे. सुमारें ८०० कोटी डॉलर्स किंमतीचा हा माल बाजारपेठेंत आल्यास शेतीच्या मालाच्या किंमती एकदम घसरून आपत्ति ओढवेल हें उघडच आहे. म्हणून अमेरिकन सरकारनें तो विकत घेऊन सांठवून ठेवला आहे. शेतीचें उत्पादन इतकें वारेमाप नसतें तर अमेरिकेंतील शेतीच्या मालाच्या किंमती सध्यांपेक्षा १० टक्क्यांनीं अधिक राहिल्या असत्या आणि अमेरिकन शेतकऱ्यांचें उत्पन्न २० टक्क्यांनीं वाढलें असतें असा अंदाज अमेरिकन शेतकी चिटणिसांनीं केला आहे. हा शिल्लक माल देशांत खपविणें शक्य नसल्यामुळें ह्या ना त्या मार्गानें परदेशांत त्याची विल्हेवाट लावण्याचा मार्ग सुचविण्यांत येत आहे. पण ह्याहि मार्गांत अडचणी उपस्थित झाल्या आहेत. अमेरिकेशीं स्नेहाचीं नातीं असणाऱ्या कांहीं देशांतूनहि शेतीच्या शिल्लकी मालाचा प्रश्न कठीण होऊन बसला आहे.

अर्थातच, अमेरिकेनें आपला शिल्लकी माल स्वस्त दरानें व सवलतीनें परदेशांत खपविण्याचे प्रयत्न केल्यास त्याला इतर देशांकडून विरोध होऊं लागतो. न्यूझीलंड ह्या देशांत दूधदुभत्यांचे टिकाऊ पदार्थ तयार करण्याचा धंदा चांगला भरभराटलेला आहे. अमेरिकेनें ह्याच प्रकारचा माल परदेशांतून खपविण्यास सुरवात केल्याबरोबर न्यूझीलंडच्या सरकारनें कडक टीका करण्यास सुरवात केली. कॅनडाचे ट्रेड कमिशनर मि. होजे ह्यांनीं गव्हासंबंधीं अशीच तक्रार केली आहे. अमेरिकेचा शिल्लकी गहूं जागतिक बाजारपेठेंत आल्यामुळें ती बिघडली आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. सयाम आणि ब्रह्मदेश ह्या देशांची अर्थव्यवस्था तांदुळाच्या निर्यातीवर अवलंबून असते. अमेरिकेनें आपल्याजवळील शिल्लकी तांदूळ अत्यंत स्वस्त भावानें विकण्यास सुरवात केल्याबरोबर त्या देशांनीं तक्रार केली आहे. ब्राझिल देशाला अमेरिकेनें शिल्लकी गहूं विकण्याचा करार केल्याबद्दल युराग्वेचें सरकार नाराज झालें आहे. ब्राझिल ही आपली बाजारपेठ आहे, असें युराग्वेच्या सरकारचें म्हणणें आहे. ह्या अडचणीच्या परिस्थितीचा अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्याला फार त्रास होऊं लागला आहे. एका बाजूनें शिल्लकी मालाची विल्हेवाट लावण्याची अमेरिकन कॉंग्रेसची निकड आहे; तर दुसऱ्या बाजूनें अमेरिकन स्पर्धेमुळें ज्यांचें नुकसान होतें अशा देशांचा विरोध वाढत आहे. १९५५ सालीं अमेरिकन सरकारनें सुमारें २०० कोटी डॉलर्सचा माल परदेशीं खपविला. तरी सुद्धां अमेरिकेंतील शेतीचा शिल्लकी माल वाढतच आहे. ह्या चमत्कारिक परिस्थितीचा फायदा रशिआला मिळत आहे. गेल्या कांहीं महिन्यांत रशिआनें आशिआ व आफ्रिका ह्या खंडांतील देशांना आर्थिक मदत देऊं करण्याचें धोरण स्वीकारलें आहे. सोव्हिएट रशिआ अविकसित राष्ट्रांना औद्योगिक यंत्रसाहित्य देण्यास तयार असून त्याचा मोबदला म्हणून निरनिराळ्या देशांतील वरकड शेतीचा माल घेण्यास तयार आहे. उदाहरणार्थ, इजिप्तचा शिल्लकी कापूस, ब्रह्मदेशाचा शिल्लकी तांदूळ अगर पाकिस्तानमधील शिल्लकी ताग घेऊन त्यांच्या बदला भांडवली माल देण्याची तयारी रशिआनें दाखविली आहे. ह्या बाबतींत अमेरिकेचें धोरण व रशिआचें धोरण ह्यांच्यांत मागासलेल्या राष्ट्रांच्या दृष्टीनें फार फरक दिसून येत आहे.

### जगाची भरभराट होत चालली आहे

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या विद्यमानें जगांतील सांप्रतच्या परिस्थितीची माहिती देणारें १९५५ चे आंकडेशास्त्रीय वार्षिक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. संघटनेतर्फे प्रकाशित करण्यांत आलेलें हें सातवें पुस्तक आहे आणि तें नेहमींप्रमाणें माहितीनें भरलेलें आहे. ह्या पुस्तकांत आंकड्यांचीं १८३ कोष्टकें आहेत. १९५४ सालअखेर संपलेल्या २० वर्षांच्या काळांतील लोकसंख्याविषयक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक माहिती आंकडेवारीनें देण्यांत आलेली आहे. १९५४ सालीं जगाची लोकसंख्या २०५.२ कोटींच्या घरांत होती. १९३० सालांतील लोकसंख्येपेक्षा हा आंकडा ३२ टक्क्यांनीं अधिक असून १९४० सालापेक्षा १८ टक्क्यांनीं अधिक आहे. एकूण लोकसंख्येपैकी निम्यापेक्षाहि थोडे अधिक लोक आशिआ खंडांतील देशांतून वास्तव्य करतात. युरोपमधील लोकसंख्या अधिक दाटीवाटीनें नांदत असलेली आढळून येते. ओशिआनिआ ह्या भागांतील लोकसंख्या दर चौरस किलोमीटर क्षेत्रफळांत अवघि दोन असल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. दाट लोकसंख्येच्या दृष्टीनें हीं दोन विरुद्ध टोंकेच आहेत. बिगर-कम्युनिस्ट राष्ट्रांच्याकडून दिल्या गेलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं जगाच्या ह्या भागांतीलसुद्धां कारखान्यांचें व खाणींचें उत्पादन वाढलेलें आहे. युद्धपूर्व काळांतील कोणत्याहि वर्षापेक्षा १९५४ सालीं कारखान्यांचें व खाणींचें उत्पादन जवळ जवळ दुप्पट झाल्याचें आढळून आलें. वाहतुकीच्या बाबतींतहि प्रगति झाल्याचें दिसतें. रेल्वे मार्गावरील वहातुकहि दुप्पट झाली आहे. बोटींवरून ने-आण करण्यांत येणाऱ्या मालांतहि ५० टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. १९३८ च्या मानानें रस्त्यावरील मोटारींची संख्याहि दुप्पट झाली आहे. अहवालाच्या ६४४ पानांवर पसरलेल्या माहितीवरून असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं जग पूर्वीपेक्षा अधिक श्रीमंत, अधिक उद्योगी आणि अधिक निरोगी झालें आहे.

### १९५५ मधील नव्या कंपन्या

१९५५ च्या पहिल्या नऊ महिन्यांत एकूण ९९३ नव्या लिमिटेड कंपन्या नोंदण्यांत आल्या. त्यांचें अधिकृत भांडवल १००.८८ कोटी रुपये होतें. १९५४ च्या ह्याच मुदतींत १६३.०७ कोटी रुपये अधिकृत भांडवलाच्या ८७७ कंपन्यांची नोंद झाली होती. १९५५ मधील नव्या कंपन्यांपैकी १३५ प्रायव्हेट व ८५५ पब्लिक होत्या. ह्या सर्व कंपन्यांपैकी ५१९ कंपन्यांचें अधिकृत भांडवल ५० हजार ते १ लक्ष रु. व ४ लक्ष ते ५ लक्ष रुपये होतें.

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

*Balance Sheet as at 31st December, 1955.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** | | |
| 1,00,000 Shares of Rs. 50 each ... | | 50,00,000—0—0 |
| **Issued and Subscribed Capital** | | |
| 64,000 shares of Rs. 50/- each ... | | 32,00,000—0—0 |
| **Called and Paid-up Capital** | | |
| 64,000 Shares of Rs. 50/-each | | |
| Rs. 25/- per share called and paid up ... | | 16,00,000—0—0 |
| **Calls in Advance** ... | | 150—0—0 |
| **2. Reserve Fund and Other Reserves** | | |
| As per last Balance Sheet ... | 7,00,000—0—0 | |
| Additions during the year ... | 75,000—0—0 | 7,75,000—0—0 |
| **3. Deposits and Other Accounts:** | | |
| Fixed Deposits ... | 1,53,61,489—2—0 | |
| Savings Bank Deposits ... | 2,08,21,709-11-10 | |
| Current accounts, Contingency accounts etc. ... | 1,44,48,278—4—7 | 5,06,31,477—2—5 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| (i) In India ... | 6,75,000—0—0 | |
| (ii) Outside India ... | nil | 6,75,000—0—0 |
| **Particulars** | | |
| (i) Secured by part of Bank's Investments ... | 6,75,000—0—0 | |
| (ii) Unsecured ... | nil | |
| **5. Bills Payable** | | 3,25,657—8—7 |
| **6. Bills For Collection, being Bills Receivable as per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 31,15,198—6—4 | |
| (ii) Payable outside India ... | nil | 31,15,198—6—4 |
| **7. Other Liabilities** | | |
| Unpaid Dividend ... | 11,357—5-11 | |
| Rebate on Bills Discounted ... | 477—4—3 | |
| Branch Adjustments ... | 6,98,190—4-10 | 7,10,024-15—0 |
| **8. Acceptances, Endorsements and other obligations per Contra** | | 4,25,995—0—0 |
| **9. Profit and Loss** | | |
| Profit as per last Balance Sheet ... | 3,60,948-14—8 | |
| Less appropriations:— | | |
| Reserve Fund Rs. 75,000—0—0 | | |
| Provision for Income-tax and Super-tax Rs. 1,70,000—0—0 | | |
| Dividend Rs. 80,000—0—0 | 3,25,000—0—0 | |
| | 35,948-14—8 | |
| Add profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss account ... | 3,45,795—2-10 | 3,81,744—1—6 |
| **10. Contingent Liabilities** | | |
| On partly paid shares in joint stock companies held by the Bank as investments including shares of the subsidiary company ... | 1,30,750—0—0 | |
| *Note*:—Provision in respect of future gratuity to the staff has not been made, the liability for which has not been ascertained. | | |
| Total Rs. ... | | 5,86,40,247—1-10 |

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

*Balance Sheet as at 31st December, 1955.*

## PROPERTY AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand and with Reserve Bank and State Bank of India ( Including Foreign Currency Notes ) ... | | 57,75,577–10–6 |
| **2. Balance with Other Banks** ( In current account ) | | |
| ( i ) In India ... | 3,38,300–8–10 | |
| ( ii ) Outside India ... | nil | 3,38,300–8–10 |
| **3. Money at Call and Short Notice** ... | | nil |
| **4. Investments :** | | |
| Securities – At or below redemption value. | | |
| ( i ) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments. ( Out of these Securities of the face value of Rs. 93,06,000 are with Banks for over-draft arrangements ) ( Market value Rs. 2,29,79,565–14–0 ) ( Face value Rs. 2,36,68,600–0–0 ) | 2,33,42,804–4–10 | |
| ( ii ) Shares : At or below cost. Ordinary Shares ( fully paid-up ) (Market value Rs. 1,42,219–12–0) Rs. 1,24,970–0–3; Preference shares (fully paid-up) ( Market value Rs. 3,76,670–0–0 ) Rs. 3,43,663–13–0; Ordinary shares, (partly paid-up) ( Market value Rs. 20,741–0–0 ) Rs. 18,218–11–2 | 4,86,852–8–5 | |
| (iii) Debentures or Bonds : At cost ( Market value Rs. 14,280–0–0 ) ... | 14,000–0–0 | |
| (iv) Gold ... | nil | 2,38,43,656–13–3 |
| **5. Advances** | | |
| (Other than bad and doubtfull debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors ) | | |
| (1) Loans, Cash-credits, Over-drafts etc. ( i ) In India Rs. 2,31,77,052–15–3; ( ii ) Outside India nil | 2,31,77,052–15–3 | |
| (2) Bills discounted and purchased (Excluding Treasury Bills of the Central and State Governments) Payable in India Rs. 1,89,060–4–3; Payable outside India nil | 1,89,060–4–3 | 2,33,66,113–3–6 |
| **Particulars of Advances** ( *See Page 94* ) | | |
| **6. Bills Receivable, Being Bills For Collection As Per Contra** | | |
| ( i ) Payable in India ... | 31,15,198–6–4 | |
| ( ii ) Payable outside India ... | nil | 31,15,198–6–4 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations per Contra** | | 4,25,995–0–0 |
| **8. Bank's Premises :** Less depreciation. | | |
| Cost as at 31–12–1954 ... | 8,31,704–15–3 | |
| Additions during the year ... | 1,750–0–0 | |
| | 8,33,454–15–3 | |
| Less total depreciation to-date ... | 47,484–15–3 | 7,85,970–0–0 |
| **9. Furniture, Fixtures, Safe Deposit Vault Etc.** | | |
| Less Depreciation ; | | |
| Cost as at 31st December 1954 ... | 5,59,617–3–8 | |
| Additions during the year ... | 31,267–10–0 | |
| | 5,90,884–13–8 | |
| Less total depreciation to-date ... | 1,37,525–9–0 | 4,53,359–4–8 |
| **10. Other Assets Including Silver** | | |
| Stamps on hand ... | 2,625–3–9 | |
| Tax paid in advance and at source ... | 1,95,937–9–10 | |
| Interest accrued on investments ... | 1,53,753–3–4 | |
| Sundry advances ... | 62,760–1–10 | |
| Shares of the Executor and Trustee Co. ( Partly paid-up ) | 1,21,000–0–0 | 5,36,076–2–9 |
| **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims...** | | nil |
| Total ... | | 5,86,40,247–1–10 |

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1955 on page 93**

| | Particulars of advances:— | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| ( i ) | Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 1,90,60,128—3-10 |
| ( ii ) | Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 7,71,912—4—3 |
| (iii) | Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 35,34,072-11—5 |
| ( iv ) | Debts considered doubtful or bad not provided for ... | nil |
| | | 2,33,66,113—3—6 |
| ( v ) | Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 9,52,011—8—3 |
| ( vi ) | Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 14,00,338-13—9 |
| (vii) | Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 9,52,011—8—3 |
| (viii) | Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 18,17,695—3—5 |
| ( ix ) | Due from Banking Companies:— ( Secured ) ... | 64,308—5—7 |
| | ( Unsecured ) ... | 2,17,852—1—0 |

***Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1955***

| EXPENDITURE | Rs. As.Ps. |
|---|---|
| 1. Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | 7,87,727—1—6 |
| 2. Salaries and Allowances and Provident Fund: Manager 17,700—0-0; Others 6,53,359-13-4 | 6,71,059-13—4 |
| 3. Directors' & Local Committee members' fees & allowances ... | 10,675—0—0 |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | 86,485-14—6 |
| 5. Law Charges ... | 2,753-13—0 |
| 6. Postage, Telegrams, Stamps and Telephone ... | 43,786—1—2 |
| 7. Auditor's Fees ... | 2,500—0—0 |
| 8. Depreciation on and Repairs to the Banking Company's Property | 57,765—8—9 |
| 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 1,05,447—0—2 |
| 10. Loss from Sale of or dealing with Non-Banking Assets ... | nil |
| 11. Other expenditure: Sundry Charges 34,804-13-3; Travelling and Conveyance 14,999-10-0 | 49,804—7—3 |
| 12. Balance of Profit (Subject to Taxation) carried to Balance Sheet ... | 3,45,795—2-10 |
| Total ... | 21,63,799-14—6 |

| INCOME | Rs. As. Ps. |
|---|---|
| (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary Provisions) | |
| 1. Interest and Discount ... | 19,22,627-13—8 |
| 2. Commission, Exchange, Brokerage | 1,91,927—4-10 |
| 3. Rent (Less taxes and other charges) | 15,787—6—0 |
| 4. Net Profit on sale of Investments, Gold & Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserve or any particular Fund or Account) ... | nil |
| 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold & Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserve or any particular Fund or Account) ... | nil |
| 6. Income from Non-Banking Assets and Profit from Sale of or dealing with such Assets ... | nil |
| 7. Other receipts: Transfer fees 479-2-0; Lockers rental 32,978-4-0 | 33,457—6—0 |
| Total ... | 21,63,799-14—6 |

**Statement pursuant to Section 132-A of the Indian Companies Act of 1913 as amended by Act XXII of 1936.**

The Profit of the Subsidiary Company viz. the Maharashtra Executor and Trustee Company Limited for the year ending 31st December 1954 has been included in the item 'By interest' etc. in the Profit and Loss account of the Bank to the extent of the dividends (in respect of the Bank's share holdings) declared and paid by the above named subsidiary Company. Undistributed balance including the profit for the year 1955 has been carried forward or otherwise dealt with in the accounts of the said Company.

**P. V. Agashe**, *Accountant.* **C. V. Joag**, *Manager.* **V. P. Varde**, *Chairman.*

N. G. Pawar, M. R. Joshi, B. M. Gupte, S. G. Marathe, F. D. Pudumjee, M. B. Jambhekar, D. K. Sathe, M. V. Shah, M. S. Parkhe — *Directors.*

POONA CITY,
25th January, 1956

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bank of Maharashtra Ltd., as at 31st December, 1955, and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the audited accounts of Bombay, Girgaon, Dadar, Sholapur (Phaltan Galli and Murarji Peth) and Nagpur Branches and certified returns of other Branches and report that:

(a) We have obtained all the information and explanations we have required; (b) In our opinion, the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law; (c) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the books of the Bank; and (d) In our opinion, books of account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act.

We have to report further that: (e) the information and explanations required by us have been found to be satisfactory; (f) The transactions of the Bank which have come to our notice, in our opinion have been within the powers of the Bank; (g) the returns received from the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of this audit; (h) The Profit and Loss Account, in our opinion, shows a true balance of Profit for the period covered by such account.

POONA CITY,
25th January, 1956.

**G. D. Apte, B. A., G. D. A., F. C. A.**
*Chartered Accountant, Poona 2.*

**Kulkarni & Khanolkar.**
*Chartered Accountants, Bombay.*

## अमेरिकेच्या मदतीविषयीं कांहीं विचार

अमेरिकेच्या अर्थखात्याचे माजी चिटणीस मि. हेन्री मॉर्गेन्थ ह्यांनीं, भारताला जी आर्थिक मदत अमेरिकेकडून देण्यांत येते तीसंबंधीं कांहीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात कीं, भारताविषयीं अमेरिकेला वाटणाऱ्या स्नेहाच्या भावनेचें प्रतीक म्हणून अमेरिकेच्या सरकारनें भारतीय सरकारला ५० कोटी डॉलर्सचें कर्ज सरळच द्यावें. भारतानें आखलेला दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी ह्या मदतीचा फार उपयोग होईल. कार्यक्रमांतील योजना कृतींत उतरविण्यासाठी भारताला सुमारें १ अब्ज, ६८ कोटी डॉलर्सच्या परकीय हुंडणावळीची गरज लागेल. भारताच्या अर्थमंत्र्यांनीं निरनिराळया मार्गांनीं तूट भरून काढण्याचें ठरविलें आहे. त्यांच्या प्रयत्नांनीं अंदाजें ३५ ते ४० कोटी डॉलर्सची तूट भरून निघूं शकेल. पण उरलेली तूट दुसऱ्या मार्गांनीं भरून काढावी लागेल. भारताला देऊं करावयाच्या कर्जाची मुदत ३० वर्षांची असावी आणि त्यावर २ टक्के दरानेंच व्याजाची आकारणी करण्यांत यावी. अमेरिका हा सधन देश आहे. स्वतःचें अंदाजपत्रक बिघडूं न देतां एवढें कर्ज देणें त्या देशाला शक्य आहे. कर्जाच्या व्यवहारावर कोणत्याहि प्रकारच्या अटी घालण्यांत येऊं नयेत. भारताची आर्थिक स्थिति सुधारली कीं, हें कर्ज फेडण्यांत येईल ह्याविषयीं त्यांना खात्री वाटते. केवळ धंदेवाईक दृष्टीनें पाहिलें तरी सुद्धा असें कर्ज देणें योग्य होईल असेंही मत त्यांनीं व्यक्त केलें. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाविषयींच्या कांहीं प्रश्नांना उत्तरें देतांना ते म्हणाले कीं, लाखो कामासू लोक काम करण्यास तयार असतांना योजनांसाठी लागणारा पैसा तुटीच्या अर्थसंकल्पाच्या मार्गानें उभारण्यास भय वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. भारतांत, यांत्रिकीकरण करण्यांत आलेली मोठी सरकारी शेती स्थापन करण्यांत सध्याच्या परिस्थितींत, मोठी चूक होईल; कारण यामुळें हजारो लोकांना बेकार व्हावें लागेल, असें त्यांचें मत आहे.

## साखरेचें उत्पादन वाढविण्याचा कार्यक्रम

१९५३–५४ मध्यें भारताची लोकसंख्या ३७३ कोटी होती व तिनें ४८·२२ लक्ष टन गूळ व साखर विकत घेतली. तेव्हां, १९६१ मधील अपेक्षित ४१ कोटी लोकसंख्येला ५२·७७ लक्ष टन गूळ व साखर लागेल, असा अंदाज आहे. त्यापैकीं, २२·५ लक्ष टन साखरेची मागणी असेल. म्हणजे, येत्या पांच वर्षांत ३·७९ लक्ष टन अधिक साखर उत्पादनाची व्यवस्था व्हावी लागेल. त्यापैकीं १·२९ लक्ष टनांचें उत्पादन विद्यमान कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढवून व २·५ लक्ष टनांचें उत्पादन २५ नवें साखर कारखाने स्थापून घडवून आणावें लागेल. त्याबरोबरच, उसाचें उत्पादनहि ६१० लक्ष टनांवरून ७७० लक्ष टनांवर न्यावें लागेल. साखरेच्या धंद्याच्या वाढीसाठी आणखी २५ कोटी रुपयांची गुंतवणूक आवश्यक होईल व त्यामुळें १५,००० नवे रोजगार निर्माण होतील. साखरेच्या धंद्याच्या डेव्हलपमेंट कौन्सिलची सभा दिल्ली येथें भरली होती, तिच्यामध्यें ह्या प्रश्नाचा विचार झाला.

## कर्वे कमिटीचा अहवाल

कर्वे कमिटीचा मूलभूत दृष्टिकोन प्लॅनिंग कमिशननें मान्य केला असला, तरी प्रत्यक्ष निर्णय घेण्यांत आलेले नाहींत. ग्रामोद्योगासाठी स्वतंत्र मंत्री असावा व गिरण्यांच्या कमाल उत्पादनावर नियंत्रण असावें, ह्या दोन्ही शिफारसींबाबत प्लॅनिंग कमिशन अजून विचार करीत आहे.

## इनकम् टॅक्सचे दर

**७२,००० रु. ते ३०,००,००० रुपये एकूण प्राप्तीवर पडणारा नव्या दरानें कर**

| प्राप्ति (रु.) | विवाहित | | अविवाहित | |
|---|---|---|---|---|
| | मिळविलेलें उत्पन्न | मिळविलेलें उत्पन्न % | मिळविलेलें उत्पन्न | मिळविलेलें उत्पन्न % |
| ७२,००० | ३२,९१० | ४५·७ | ३२,९६० | ४५·८ |
| ८४,००० | ४२,०९८ | ५०·१ | ४२,१४८ | ५०·२ |
| ८५,००० | ४२,८८५ | ५० ४ | ४२,९३५ | ५०·४ |
| ९०,००० | ४६,८२३ | ५२ ० | ४६,८७३ | ५२·० |
| ९६,००० | ५१,७४५ | ५३·८ | ५१,५९५ | ५३·८ |
| १,००,००० | ५५,०२६ | ५५·० | ५५,०७६ | ५५·० |
| १,५०,००० | ९८,६६७ | ६५·८ | ९८,७१७ | ६५·८ |
| २,००,००० | १,४४,६०४ | ७२·३ | १,४४,६५४ | ७२·३ |
| २,५०,००० | १,९०,५४१ | ७६·२ | १,९०,५८९ | ७६·२ |
| ३,००,००० | २,३६,४७८ | ७८·८ | २,३६,५२८ | ७८·८ |
| ३,५०,००० | २,८२,४१५ | ८० ७ | २,८२,४६६ | ८०·७ |
| ४,००,००० | ३,२८,३५३ | ८२·१ | ३,२८,४०३ | ८२·१ |
| ५,००,००० | ४,२०,२२८ | ८४·० | ४,२०,२७८ | ८४·० |
| १०,००,००० | ८,७९,६०३ | ८८·० | ८,७९,६५३ | ८८·० |
| २०,००,००० | १७,९८,३५३ | ८९·९ | १७,९८,४०३ | ८९·९ |
| ३०,००,००० | २७,१७,१०३ | ९०·६ | २७,१७,१५३ | ९०·६ |

## रशिआंत कामाच्या तासांत कपात

प्रत्येक शनिवारच्या कामाच्या तासांत दोन तासांची कपात सोव्हिएट सरकारनें जाहीर केली आहे. रशिआंतील कामगाराला आठवड्यांतून सहा दिवस व दिवसांतून नऊ तास (त्यांत एक तास जेवणाची सुट्टी) काम करावें लागतें. दरमाणशीं तर ताशीं उत्पादन वाढवून, कामगारांच्या वेतनांत कपात होऊं न देण्याची दक्षता कारखान्यांच्या व्यवस्थापकांनीं घ्यावी अशी अपेक्षा आहे.

## कॉंक्रीटचे रस्ते करण्यासाठी विजेचा उपयोग

रस्त्यांवर कॉंक्रीटचे थर घातले, म्हणजे कित्येक आठवडे वहातुकीस अडथळा येतो; कॉंक्रीट पक्कें होण्यास फार वेळ लागतो. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर, येथील शास्त्रज्ञांनीं "इलेक्ट्रो–क्युअरिंग" च्या पद्धतीचे प्रयोग केले, ते यशस्वी झाले आहेत. नव्यानें घातलेल्या कॉंक्रिटमधून विजेचा अल्टरनेटिंग करंट चोवीस तास चालू ठेवला, म्हणजे पाण्याखाली अनेक दिवस कॉंक्रीट ठेवण्याइतकें तें मजबूत होतें.

## कात्रीचा अधिकाधिक उपयोग

मध्यवर्ती फिल्म सेन्सार बोर्डाची स्थापना होऊन गेल्या जानेवारींत पांच वर्षें झालीं. ह्या मुदतींत, आयात केलेले ९,८२४ चित्रपट बोर्डानें तपासले. चित्रपटांची संख्या गेल्या तीन वर्षांत कमी झाली. नामंजूर करण्यांत आलेल्या चित्रपटांची संख्या गेल्या पांच वर्षांत अनुक्रमें ५, १६, २१, ३८ व ४८ अशी भरली. प्रचार, लैंगिक आकर्षण आणि गुन्हेगारी ह्यांनीं भरलेले ५०% चित्रपट असतात, त्यामुळें कात्री लावण्याची अधिकाधिक पाळी येते.

**गोशाळांची वाढ**—भारतामधील कांहीं निवडक गोशाळांची वाढ व विस्तार करण्याची योजना मध्यवर्ती सरकारनें आंखली आहे. निवडलेल्या गोशाळांना चांगल्या जातीच्या गाई व एक वळू देण्यांत येईल. प्रत्येक गोशाळेला एकदां ५,००० रुपये व नंतर दरसाल २,००० रुपये मदत म्हणून देण्यांत येतील.

**वृत्तपत्रीय कागदाचा तुटवडा**—कॅनेडिअन पल्प अँड पेपर असोसिएशनचे अध्यक्ष, मि. रॉबर्ट फौलर, ब्रिटनमधील कागदकारखानदारांच्या वार्षिक परिषदेसाठीं लंडनला गेले आहेत. जगांतील वृत्तपत्रीय कागदाचा पुरवठा आणखी कांहीं काळ तरी अपुराच असेल, असें मत त्यांनीं वार्ताहरांजवळ बोलतांना व्यक्त केलें आहे.

**भारतामधील हिऱ्यांचें उत्पादन**—गेल्या वर्षी भारतामधील हिऱ्यांच्या खाणींतून १,५८८ कॅरेट वजनाचे हिरे काढण्यांत आले, अशी माहिती लोकसभेंत सरकारतर्फे सांगण्यांत आली. १९५५–५६ सालीं हिऱ्यांच्या खाणींवरील 'रॉयल्टी'च्या रूपानें सरकारला ९७,३१२ रुपयांची प्राप्ति झाली.

**अमरेळीला पाण्याचा पुरवठा**—अमरेळी गांवाला पाण्याचा पुरवठा करण्याच्या योजनेचें उद्घाटन करण्यांत आलें. ह्या योजनेचा प्रारंभ १९५१ सालीं करण्यांत आला होता. अमरेळी गांवाची लोकसंख्या सुमारें ३५,००० असून त्याच्या गरजा भागविण्यासाठीं रोज ७५,००० गॅलन पाणी आतां पुरविण्यांत येईल.

**भारत–रशिआ बोटींची वहातूक**—भारत व रशिआ ह्यांच्या दरम्यान नियमितपणें बोटींची वहातूक सुरू करण्याच्या हेतूनें वाटाघाटी करण्यांत येत आहेत. वाटाघाटींत भारतीय बोट वहातुकीच्या धंद्यांतील खाजगी भांडवलाचे प्रतिनिधीहि भाग घेत आहेत. येत्या तीन वर्षांत भारत व रशिआ ह्यांच्या दरम्यानची सागरी वहातूक दरसाल १० लाख टनांपर्यंत जाईल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**साखरेचा नवा कारखाना**—हैद्राबाद राज्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत यावयाचा साखरेचा नवा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याची नोंदणी करण्यांत आली आहे. सहकारी संस्थेनें २० लाख रुपयांचें भांडवल जमविल्यास मध्यवर्ती सरकारकडून २० लाख रुपयांची मदत मिळणार आहे. कारखान्यांत रोज ८०० टन ऊंस गाळणारी यंत्रसामुग्री बसविण्यांत येईल.

**नवीन करांवर टीका**—सुरत चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेनें भारतीय सरकारच्या अंदाजपत्रकांतील करांवर टीका केली आहे. गरजेच्या तेलावर बसविण्यांत आलेल्या करामुळें गरीब व मध्यम वर्गावर बोजा पडेल. त्याचप्रमाणें नफ्यावर बसविण्यांत आलेला कर तत्त्वतः चुकीचा असून त्यामुळें भांडवलाच्या संचयाला अडथळा होईल, असें मत चेंबरतर्फे व्यक्त करण्यांत आलें आहे.

**पूर्व पाकिस्तानांतील कापडाच्या गिरण्या**—पूर्व पाकिस्तानांतील कांहीं कापडाच्या गिरण्यांना कोळशाचा तुटवडा भासूं लागल्यामुळें त्या बंद पडण्याचा संभव निर्माण झाला आहे. गिरण्यांना कोळशाचा पुरवठा करण्याचा मक्ता सरकारनें नेमलेल्या एजंटांकडे आहे. त्यांनीं मार्च व एप्रिल महिन्याच्या कोळशाचीं बिलें आगाऊच धाडलीं. पुरवठा मात्र गेल्या डिसेंबरमध्यें मिळावयाच्या कोळशाचाहि झालेला नाहीं.

## पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि.

### जुन्नर शाखेचा रौप्यमहोत्सव

पुणें सेंट्रल को–ऑप. बँकेच्या जुन्नर शाखेचा रौप्यमहोत्सव रविवार दिनांक ११ मार्च १९५६ रोजीं सकाळीं ११ वाजतां मुंबई राज्याचें राज्यपाल डॉ. हरेकृष्ण मेहताब यांचे अध्यक्षतेखालीं न्यू स्कूल, जुन्नरचे पटांगणांत मोठ्या थाटानें साजरा झाला. या समारंभाकरितां भारताचे राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद व उपराष्ट्रपति डॉ. एस. राधाकृष्णन्, अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख, कृषिमंत्री श्री. पंजाबराव देशमुख, गृहमंत्री पंडीत पंत इत्यादिकांचे शुभसंदेश आले होते.

प्रारंभीं न्यू स्कूल, जुन्नर येथील विद्यार्थिनींनीं स्वागतपर पद्य म्हटल्यानंतर शाखेचे एजंट श्री. दि. अ. कुलकर्णी यांनीं आलेले शुभसंदेश वाचून दाखविले.

बँकेचे व्हाइस चेअरमन श्री. शि. भ. काळे यांनीं राज्यपाल व उपस्थितांचें स्वागत करून जुन्नर शाखेच्या रौप्यमहोत्सवासाठीं आपले राज्यपाल अध्यक्ष म्हणून लाभले हें बँकेचें महद्भाग्यच होय, असें सांगितलें.

डॉ. हरेकृष्ण मेहताब यांनीं रौप्य महोत्सव ग्रंथाचें प्रकाशन केल्यानंतर बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वा. ग. आळतेकर यांनीं अहवाल वाचून दाखविला.

श्री. दा. वि. गोखले व श्री. वा. ब. गोगटे यांनीं जुन्नर शाखेसंबंधीं व बँकेसंबंधीं माहिती निवेदन केली.

अध्यक्षीय भाषणांत डॉ. हरेकृष्ण मेहताब यांनीं सहकारी चळवळीचा गेल्या ५० वर्षांचा आढावा घेतला व मुंबई व मद्रास या दोन राज्यांत सहकारी चळवळीची वाढ उत्तम झाली याचें कारण या दोन राज्यांत मोठा जमिनदार वर्ग इतर राज्यांच्या मानानें कमी संख्येनें होता हें असल्याचें सांगितलें व बँकेची व जुन्नर शाखेची अशीच भरभराट होवो अशी शुभेच्छा प्रदर्शित केली.

श्री. वा. ब. गोगटे यांनीं राज्यपाल डॉ. हरेकृष्ण मेहताब, उपस्थित लोक, न्यू स्कूल जुन्नरचे मुख्याध्यापक व इतरांचें आभार मानल्यावर राष्ट्रगीत होऊन हा समारंभ संपला.

### प्रायव्हेट कंपन्यांचा 'प्रायव्हेट' पणा जाहीर करा

१ एप्रिल, १९५६ नंतर प्रत्येक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीनें आपल्या नांवांत 'लिमिटेड' ह्या शब्दाचे आधीं 'प्रायव्हेट' हा शब्द वापरलाच पाहिजे. सर्व प्रायव्हेट कंपन्यांनीं आपलीं मूळ सर्टिफिकिटें रजिस्ट्रारकडे पाठवावीं, म्हणजे त्यांत 'प्रायव्हेट' हा शब्द दाखल केला जाईल. १ एप्रिल रोजीचे डायरेक्टर्स, मॅनेजिंग डायरेक्टर्स, मॅनेजिंग एजंटस, मॅनेजर, इत्यादींचा तपशीलहि रजिस्ट्रारकडे धाडला पाहिजे.

### "अंबर चरख्यास मान्यता द्या"

अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग बोर्डानें भारत सरकारला बोर्डाचा अंबर चरख्याचा १९५५–५६ चा कार्यक्रम मान्य करण्याची विनंति केली आहे. अंबर चरख्याच्या कार्यक्षमतेची तपासणी पुरी झाली नसली, तरी सुमारें ५० लक्ष लोकांना काम पुरविण्याची त्याची क्षमता सरकारनें लक्षांत घ्यावी व त्यासाठीं आर्थिक तरतूद करावी, अशी सूचना बोर्डानें केली आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.